पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) ( Formerly Solapur University)
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in
ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०

**संदर्भ- पुअहोसोवि/परीक्षा/विज्ञान/२०२२/८२९** **दि. २२/०६/२०२२**

# प रि प त्र क क्रमांक - ३९

**सदर्भ :- प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक ३७, जा क्र. पुअहोसोवि/पवमुमं/८११, दिनांक २० जून,२०२२**

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/प्राचार्या, विभाग प्रमुख यांना कळविणेत येते की, आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक (Practical) परीक्षा ऑफलाईन घेण्याचे आयोजन करण्यात यावे. अशा सूचना यापुर्वीच्या परिपत्रकान्वये आपणास देण्यात आल्या होत्या.

वर नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळया अभ्यासक्रमाच्या सर्व लेखी परीक्षा या कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे ऑफलाईन (Offline) पध्दतीने घेण्यात येणार असल्याचा निर्णय राज्य शासनाच्या निर्देशानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या प्राधिकरणात घेण्यात आला असल्यामुळे विद्यापीठ स्तरीय Practical/Viva/Project च्या परीक्षा देखील ऑफलाईन घेण्याचे नियोजन करावे लागणार आहे.

त्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे आता मार्च/एप्रिल २०२२ या सत्रातील परीक्षा जून/जुलै २०२२ मध्ये होणाऱ्या **बी.एस्सी भाग १, २ आणि भाग-३** च्या सर्व शाखेच्या प्रात्यक्षिक Practical/Viva/Project परीक्षा आपल्या महाविद्यालय स्तरावरुन घेण्याचे नियोजन करावे. सदरील परीक्षा ही लेखी परीक्षा पुर्वी आयोजन करणे आवश्यक आहे. तथापी ज्या महाविद्यालाचे प्रात्यक्षिक परीक्षा लेखी पुर्वी संपन्न झाले नाहीत अशा विद्यार्थांची परीक्षा ही लेखी परीक्षा संपल्यानंतर १० दिवसाच्या आत पुर्ण करणने बंधनकारक राहील. तसेच सदरची बाब सर्वाना माहित होण्यासाठी Practical/Viva/Project परीक्षेचे वेळापत्रक नोटिस बोर्डावर लावण्यात यावे. संबंधित वेळपत्रक हे ज्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्य/विभाग प्रमुख यांनी वैयक्तिरित्या लक्ष देऊन तयार करुन प्रसिध्द करण्याची योग्यती प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी.

सर्व प्रात्यक्षिक (Practical/Viva/Project) संपल्यानंतर प्रचलित नियमाप्रमाणे परीक्षेचे गुण प्रस्तुत विद्यापीठाने आपल्या महाविद्यालयास उपलब्ध करुन दिलेल्या लिंक मध्ये भरुन विद्यापीठाकडे पाठविण्याची योग्यती व्यवस्था करण्यात यावी.

**( डॉ शिवकुमार गणपूर )**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रति,**

१) प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य/प्राचार्या प्रस्तुत विद्यापीठ.

२) प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :- प्रस्तुत विद्यापीठाच्या प.मु.विभागातील संगणक व इतर विभाग.